# दिनांक १९/१२/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | २९६४/२१ कलम ३७९,३४ भादवि | चोरी | सोन्याचा एक चपला हार ३० ग्रॅम कि अं ९००००रू २. एक सोन्याचा गोफ कि अं ४५०००/- रु ३. एक नथ २ ग्रॅमची किंअं ६०००असा एकुण १४१०००/- रु | नवसारी अमरावती | दि १८-१२-२०२१ चे ११-०० वा दरम्यान | दि १८-१२-२०२१ चे १९-१८ वा | गजानन सुखदेवराव बोबडे वय ४५ वर्ष रा.माळवेज पुरा रा अचलपुर जि अचलपुर जि अमरावती | अज्ञात आरोपी अटक | पोउपनि पंकज ढोके सा सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि १८-१२-२०२१ चे १९-२५ वा ते २०-०० वा दरम्यान | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे पत्नी सह अचलपूर येथून ऑटो क्र एम एच २७ बी डब्लू ३५११ मध्ये बसून अमरावती येथे पुतण्याचे लग्नाकरिता येत असता आसेगाव पुर्णा येथून अज्ञात ०४ महीला वय अं २८ ते ३३ वयोगटातील त्याचे सोबत दोन लहान बाळ असलेले ऑटोमध्ये बसले असता व १२.३० वा दरम्यान नवसारी चौक अमरावती येथे उतरल्या नंतर ऑटो तेथून कठोरा नाका येथे येत असता ॲटो चालकाने सांगितले की फीर्यादीला तुमचे सामान चेक करुन घ्या त्यावरुन फीर्यादी यांनी त्यांचे पत्नी च्या पर्स मध्ये सोन्याचा एक चपला हार ३० ग्रॅम कि अं ९००००रू २. एक सोन्याचा गोफ कि अं ४५०००/- ३. एक नथ २ ग्रॅमची किंअं ६०००असा एकुण १,४१,०००/- रु चे फीर्यादी चे दागीने दिसून आले नाही म्हणून ते नवसारी चौकात उतरलेल्या चार अज्ञात महीलांनीच फीर्यादी चे पत्नीचे दागीने चोरुन नेले असल्याचा संशय आहे अशा फिर्यादीचे लेखी रिपोट वरुन सदरचा वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | २९६५/२१ कलम ३०७ भादवि | गंभीर दुखापत करुन जीवे मारण्याचा प्रयत्न | निरंक | गौरी इन वाय पॉइंट बायपास रोड अमरावती | दि १८-१२-२०२१ चे १६-०० वा दरम्यान | दि १८-१२-२०२१ चे १९-४० वा | शेख जाकीर शेख खालीख वय ४० वर्ष रा अकबर नगर गुलीस्ता नगर अमरावती | शेख रिझवान रा. यवतमाळ ह.मु. गुलीस्ता नगर अमरावती आरोपी अटक | पोउपनि पंकज ढोके सा सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि १८-१२-२०२१ चे १९-४५ वा ते २०-१० वा दरम्यान | हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे नविन बायपास चौक येथे कटला रिक्षावर संत्री विक्री करीत असता त्याच्या बाजूला फ्रुट विक्री करणारा शेख रिझवान रा.गुलीस्ता नगर अमरावती याने त्याला येथून बाजूला गाडी काढ असे म्हटले असता शेख जाखीर हा गाडी काढत असताना एक ग्राहक आल्याने थांबल्याचे कारणावरुन आरोपी थैलीतील चाकु काढून फीचे मांडीवर,पोटावर व डाव्या हाताचे पंजाचे बोटावर चाकुन मारुन गंभीर जखमी केले अशा फीर्यादीच्या ईर्वीन दवाखाना येथे घेतलेल्या बयानावरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | नागपुरी गेट | ८५०/२०२१ कलम ३२४.५०४, ५०६ भादवी | दुखापत करणे | निरंक | लालखडी चौक अमरावती | १८/१२/२१ चे १७.०० वा | १८/१२/२१ चे २०.४२ वा | शेख अशफाक शेख मेहबुब वय ३५ वर्ष रा बिसमिल्ला नगर अमरावती | सज्जु पुर्ण नाव माहीत नाही रा लालखडी अमरावती | १८/१२/२१ चे २०.४५ ते २१.३० वा पोहेकां रियाज ब.न ९१३ पो स्टे ना गेट अम शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी यांचा तीन दिवसा अगोदर भांडण झाले होते . नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फि हे लालखडी चौकात गेले असता त्याठिकाणी नमुद आरोपीने फिर्यादी सोबत जुने वादावरुन भांडण केले व शिवीगाळ करुन कटल्यामधिल भंगार खुर्चि फि चे डोक्यावर मारली व डावे पायावर लाथांनी मारहान केली अशा जखमिचे बयाण व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ४. | राजापेठ | १४८२/२१ कलम ४१९ ,४२०, भादवी सह कलम ६६ड आय टी अँक्ट | फसवणुक | | साईनगर अमरावती | दि. ०८/१२/२१ चे १७/४३ ते २१/५८ वा दरम्यान | १८/१२/२१ चे १७/५३ वा | संदीप भास्करराव बुटे रा. साईनगर अमरावती | मो क्र ८३८९८२२३४१ चा धारक | सपोनि कोटावार मँडम पोस्टे राजापेट दि.१८/१२/२१ चे १७/०० वा १७/३० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद ग.ता.वेळी व ठीकाणी चा धारक याने फिर्यादी यांचे वर् फोन करुन मि फोन पे सर्विस सेंटर मधुन बोलत आहे.अशी बातावणी करुन तुम्हाला कँश बँक आले आहे असे सांगुन फो पे अकाउंट उगडुन फोन वर एक लिंक पाठवुन त्यावर क्लिक करायला सांगितले तर फिर्यादी यांचे अकाउंट मधुन पैसे कमी झाले व ANY Desk हे अँप प्ले स्टोउर वरु न डाउलोड करायला लावले व ९२२३२७४४२४ या नंबर वर मँसेज करण्यास सांगितले व १००० रु करता करता एकुण ११,०००/- डेबीट झाले .अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात |

## दिनांक १९/१२/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग ६) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | १९२५/२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ | लाच घेणे | निरंक | दुय्यम निबंधक श्रेणी १ भातकुली कार्यालय अमरावती जि. अमरावती | दि. १७.१२.२०२१ चे १५.२० वा.ते १५.३० वा. दरम्यान | दि. १८.१२.२०२१ चे ००.१९ वा. | श्री गजानन रघुनाथ भातकुलकर वय २८ वर्ष व्यवसाय - नोकरी, रा. भातकुली, जि. अमरावती | सुनिल नारायण भागवत वय ३० वर्ष , व्यावसाय - नोकरी, (आय.टी. असिस्टंट) दुय्यम निबंधक भातकुली कार्यालय अमरावती | भेट देणारे व दाखल अधिकारी - पो.हे.कॉ. योगेश श्रीवास ब.नं. १०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी यांचे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या प्लॉट चे खरेदीची इन्डेक्स २ ची नक्कल देणे करिता दुय्यम निबंधक श्रेणी १ भातकुली कार्यालय अमरावती जि. अमरावती येथिल कर्मचारी श्री सुनिल नारायण भागवत यांनी २००/ रु लाचेची मागणी करित असल्याबाबची तक्रार प्राप्त झाली सदर तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान दुय्यम निबंधक श्रेणी १ भातकुली कार्यालय अमरावती जि. अमरावती .येथिल श्री सुनिल नारायण भागवत यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या प्लॉट चे खरेदी इन्डेक्स २ ची नक्कल देणे करिता तडजोडी अंती १००/ रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडुन पंचासमक्ष |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | १००/रु लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २. | बडनेरा | ९६८/२०२१ कलम २७९ भा.दं.वि. | भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्याबाबत | निरंक. | समता चौक, नवी वस्ती बडनेरा | दि.१८/१२/२०२१ चे ११/१० वाजे | दि .१८/१२/२०२१ चे १३/०६ वा | सरतर्फे ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. | गजेंद्र शरद जाधव, वय ३९ वर्षे, नवी वस्ती, बडनेरा. | ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र. MH-२७- BW-२०२५ हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन येणा-या जाणा-या लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल किंवा एखादा अपघात होईल अशा स्थितीत चालवितांना मिळुन आला. वरून सदर आरोपीचे कृत्य कलम २७९ भा.दं.वि. प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| ३. | वलगाव | ७४९/२०२१ कलम ३२८,२७२, २७३,१८८, २६९ भादवी .सहकलम २६(२),२७, २३,३०(२) अन्न सुरक्षा आणी मानके अधिनियम | अवैध्यरित्या गुटखाची वाहतुक करणे | एकुण ५६,१७०/ रुपयाचा माल व MH ०६ AN २९०७ किंमत अंदाजे १,००,०००/ रुपये असा एकुण १,५६,१७०/ रुपय ाचा माल | राधासिटी वलगाव, दर्यापुर रोड . | १८/१२/२०२१ चे १७/०० वा. | १८/१२/२०२१ चे १९/५६ वा. | एक महीला | अब्दुल जहीर अब्दुल नईम वय ३५ वर्षे रा. कमेला ग्राऊंड, नागपुरी गेट अमरावती | पोउपनि राजकिरण येवले सा. गुन्हे शाखा अमरावती शहर. अमरावती शहर दि.१८/१२/२०२१ चे १७/०० वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की,गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, यातील नमुद आरोपी हा त्याचे वाहन क्र MH ०६ AN २९०७ (मारोती सुझुकी इस्टीलो कंपनीची ) मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा , पानमसाला व सुगधिंत तंबाखु याची अवैध्यरित्या विक्री करीता साठवणुक केली वरुन सोबत पोलीस स्टाफ , व पंच असे घटनास्थळावर जावुन सदर वाहनाची तपासणी केली असता यातील नमुद आरोपीचे वाहनामध्ये १) पानपराग पानमसाला ११० पँकेट किंमत अंदाजे २७,५००/ रुपये २) नजर ५००० गुटखा ११९ पाकीट किंमत १३,०९०/ रुपये ३)७७७ गुटखा ५० पँकेट किमंत ५,०००/ रुपये ४) एन ०५सुगंधीत तंबाखु ५० पॅकेट कींमत १६५० रुपये ५)ए प्लस सुगंधीत तंबाखु ६० पॅकेट किंमत १,९८० रुपये ६) प्रिमीयर पानपराग पानमसाला ४० पॅकेट किंमत ४,८०० रुपये ७) पानबहार पानमसाला १० पॅकेट किंमत २,१५० रुपये असा एकुण ५६,१७०/ रुपयाचा माल व MH ०६ AN २९०७ किंमत अंदाजे १,००,०००/ रुपये असा एकुण १,५६,१७०/ रुपयाचा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला तसेच यातील आरोपी यानी गुटखा विक्री करीत कोवीड १९ या संसर्गजन्य रोगाचा प्रसार होवुन जन- सामान्याच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | राजापेठ | 1481 / 2021 कलम 294, 504 ब भादवि | अश्लील शिवीगाळ व मारण्याची धमकी | — | बेलपुरा अमरावती | दि. 05 / 07 / 2021 ते दि. 29 / 09 / 2021 चे 14.00 वा दरम्याण | दि. 18 / 12 / 2021 चे 00.58 वा | **एक महीला** | प्रितमसिंग विरेद्र सिंग तॅवर वय 23वर्ष रा. कलोथ्रा तह बुहाना. जि बुहाना राज्य राजस्थान | परि पोउपनि राहुल महाजन पो स्टे राजापेठ अमरावती शहर<br><br>दि. 18 / 12 / 2021 चे 00.10 वा ते 00.30 वा पावेतो विलंबाचे कारण — सदर गुन्हा तहसिल नागपुर येथुन ऑनलाईन 00.00 प्रमाणे आल्याने विलंब व लागलीच दाखल | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी नमुद फिचे सन 2019 मध्ये सोशल मेडीया फेसबुक व्दारे प्रितमसिंग विरेद्र सिंग तॅवर वय 23 वर्ष रा. कलोथ्रा तह बुहाना. जि बुहाना राज्य राजस्थान याचे सोबत ओळख झाली परंतु त्याने माझी फसवणुक केल्याने व माझेवर जबरदस्तीने बलात्कार केला त्यामुळे पोलीस स्टेशन तहासिल नागपुर येथे अप क्र 545 / 2021 कलम 376, 504 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर तक्रार दाखल झाल्याचे 5 दिवसा नंतर प्रितमसिंग तॅवर याने माझी आई हिचे मो क्र वरून फोन करून ऑसिड फेकुन इजा करण्याची धमकी दिली सदरचे धमकी बाबत पो स्टे राजापेठ अमरावती शहर येथे तक्रार देणे करीता गेले असता तेथील पोलीस निरिक्षकांनी बलात्काराचा गुन्हा जेथे दाखल आहे तेथेच गुन्हा दाखल करा व सदरचे गुंन्हयामधील तपासी अधिकारी यांना कळवा असे मटले त्यानंतर नमुद आरोपी याने त्याचे जावाई अमित व भाचा अभिषेक शेखावत यांनी वेळोवेळी माझे आई व माझे सोबत संपर्क करून माझे व प्रितमचे लग्ण लावुन देतो तुम्ही तक्रार दाखल करू नका त्याचे साठी आम्ही तुझे घरी येवु व तुझे आई वडीलांशी बोलने झाले आहे आम्ही तुझे लग्णा साठी मागणी करू असे म्हणत होते. त्याचेवर मी विश्वास ठेवला व त्याचेविरूध्द तक्रार दाखल केली नाही परंतु गुन्हा दाखल झाल्यानंतर अंदाजे 1 महीन्याने माझे घराशेजारचे दुकानातील बंद शेटरवर पॉम्पेट लावल्याचे दिसुन आले व त्यावर **एक महीला** मोठया अंक्षरात लिहले असुन त्यावर माझा व्हॉटअप चा डि पी चा फोटो लावलेला होता व त्यावर यह लडकी कॉल गर्ल है! किसी को जरूरत पडे तो इस नंबरपर संपर्क करे व खाली माझा मो क्र  दिलेला होता. त्यानंतर प्रितमसिंग तॅवर याचे जवाई अमित व भाचा अभिषेक शेकावत यांनी आज पावेतो फोनवर प्रितमचे व माझे लग्ण लावुन देतो व त्यासाठी त्याचे राहते घरी बोलावित आहे. तसेच प्रितमसिंग तॅवर हो वेगवेगळया नंबर वरून संपर्क करून रिपोर्ट परत घे असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी देत आहे. तरी प्रितमसिंग तॅवर हा मला मानसिक त्रास देत असुन त्याचे अशा वागण्यामुळे माझे दैन्नदीन जिवनाचे काम प्रभावित होत आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा ऑनलाईन नागपुर तहसिल येथुन आल्याने दाखल करून तपासात घेतला. |

# दिनांक १९/१२/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | फ्रेजरपुरा | १९२६/२०२१ कलम १२(अ)म.जु.का. | जुगार | नगदी ७६०रुपये, वरली मटका चीठ्या कि.अ.००.००रु.,एक बाल पेन कि.अ.१० रु.असा एकुन ७७०रु.चा जुगार मुद्देमाल | लोनारे मटन शॉप चपराशीपुरा अमरावती | दि.१८/१२/२०२१ चे १९.२०वा | दि.१८/१२/२०२१ चे २१.०५वा | पो.हे.कॉ. संजय काळे ब.न. ९१७ पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर | मनोज अंबादास डवरे वय ४१ वर्ष रा.रद्दीपुरा अमरावती | पो.उप.नि.राजेद्र कलाद्रे पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर दि.१८/१२/२०२१ चे २१.१०वा ते २१.३०वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फीर्यादी हे पो.स्टाप सह पोस्टे.हद्दीत जुगार रेड करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमी दाराकडुन माहीती मीळाली की लोनारे मटन शॉप चपराशीपुरा अमरावती येथे खुल्या जागेत मनोज अंबादास डवरे नावाचा इसम वरील मटका जुगार खेळ चालवीत आहे अशा माहीती वरुन लपत छपत जावुन त्या ठीकानी प्रोव्ही रेड केली असता यातील आरोपी यांचे ताब्यातुन नगदी ७६०रुपये, वरली मटका चीठ्या कि.अ.००.००रु.,एक बाल पेन कि.अ.१० रु.असा एकुन ७७०रु.चा जुगार मुद्देमाल पंचासह जप्त करण्यात आला अशा फी.चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| २ | ना गेट अम शहर | ८५१/२०२१ कलम १२(अ) मजुका | जुगार | नगदि १५८० रुपये ,एक डांट पेन कि. ५ रुपये वरलि मटका चिठ्ठ एक असे एकुन १५८५ रु चा माल | लालखडी अरमान हेअर सलुन समोर अमरावती | १८/१२/२१ चे २०.३० ते २१.०० वा | १८/१२/२१ चे २१.४८ वा | पोहेकां प्रमोद उत्तमराव गुडधे ब.न २७७ पो स्टे ना गेट अम शहर | चंदु सुभाषराव वैध्य वय ३४ वर्ष रा सौदागरपुरा वलगाव अमरावती | पोहेका रियाज ब.न ९१३ पो स्टे ना गेट अम शहर १८/१२/२१ चे २०.३० ते २१.०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमिवरुन नमुद आरोपीवर जुगार रेड केला असता तो एक ते दहा आकडे वर लोकंकडुन पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळ चालवितांना मिळुन आला त्याच्या ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाने वरिल प्रमाने माल जप्त कर्ण्यात आला त्याचे कृत्य. कलम १२(अ)मजुका प्रमाने होत असल्यो लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |

## दिनांक १९/१२/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा. | ९६९/२०२१ कलम ६५(ई) महा.दा.का. | अवैध रित्या विनापरवाना देशी दारू विक्री | ११ नग देशी दारू बाँबी संत्रा १८० मि.ली.च्या सिलबंद पावट्या किं.अं.६६० रू. चा प्रो.माल | ग्राम कवठा बहाळे ,बडनेरा | दि.१८.१२.२०२१ चे १८.१० वा. | दि.१८.१२.२०२१ चे १९.५८ वा. | सरतर्फे ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. | संतोष देविदास वानखडे , वय ४५ वर्षे , रा.ग्राम कवठा बहाळे , बडनेरा | ASI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.स्टे. बडनेरा, अम. शहर.दि.१८/१२/२०२१ चे १८/१० ते १८/३५ वा | गुन्ह्याची हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीवर प्रो.रेड केली असता त्याचे घराचे मागचे आवारात एका कोप-यात नायलाँन पिशवीमध्ये अवैधरित्या विनापरवाना ११ नग देशी दारू बाँबी संत्रा १८० मि.ली.च्या सिलबंद पावट्या किं.अं.६६० रू. चा प्रो.माल मिळुन आला. सदर आरोपीस दारू बाळगण्याबाबत परवाना विचारला असता त्याचेकडे कुठलाही परवाना नसल्याचे त्याने सांगितले वरून सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) महा.दारूबंदी कायदा प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

## दिनांक १९/१२/२०२१ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर -

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

दिनांक १९/१२/२०२१ रोजी मा.सेशन कोर्टात होणाऱ्या प्रकरणांची माहिती —निरंक